२३९८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
२३९८

# शब्दस्फोट

नारायण रा. पेडणेकर



REFBK-0021851
REFBK-0021851

वि. क्र.
२३९८
२९८५१
२९/१०/८८
३१०५

# शब्द-स्फोट

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३९८ ३१०५
२९८५१
(स्थळ प्रत)

नारायण रा. पेडणेकर

REFBK-0021851
REFBK-0021851

: मुख्य विक्रेते :
बॉम्बे बुक डेपो
गिरगांव, मुंबई ४०० ००४.

कस्तुरीमृग प्रकाशन, मुंबई

प्रथमावृत्ती : २ ऑक्टोबर १९७७

© सौ. पुष्पस्मिता ना. पेडणेकर

मुखपृष्ठ :
प्रमोद जोशी

प्रकाशक :
नारायण रा. पेडणेकर,
कस्तुरीमृग प्रकाशन,
४८, इसाक महंमद चाळ,
भवानी शंकर रोड, दादर,
मुंबई–४०० ०२८.

मुद्रक :
रावोबा म्हात्रे,
रचना प्रिन्टर्स, माहीम,
मुंबई ४०० ०१६.

मूल्य सात रुपये

डॉक्टर राममनोहर लोहिया,

लोकनायक जयप्रकाशजी आणि

अंधाराविरुद्ध जे जे लढले त्यांना—

२५ जून १९७५ रोजी एका दीर्घ अंधाराचा प्रारंभ झाला. त्याही अंधारात कलावंताची वेदना आविष्कृत करणारा एक निर्भय आवाज उठला. त्या संबंधीचे दिनांक ३१ ऑगस्ट ७५ रोजी मुंबई–महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रांतून या संग्रहातील पहिल्या दोन कवितांसह प्रसिद्ध झालेले पुढील वृत्त—

## प्रचंड शब्दस्फोटाने रसिक चकित, तर माओ हादरला !

पोस्टरित कवितांच्या दृश्य माध्यमाद्वारे कवी श्री. नारायण रा. पेडणेकर यांनी रसिकांच्या जाणीवांवर आघात करणारा प्रचंड शब्दस्फोट घडवून आणला. आता ही स्फोट–मालिका सुरू झाली आहे.

ही साहित्यिक घटना प्रभादेवीच्या नाट्य मंदिराच्या प्रवेशद्वारी रसिकांना आडवे जाऊन व घेरून साकार करण्यात आली. नाट्य मंदिरात प्रवेश करणाऱ्या नाट्य-रसिकांनी या घटनेचे विस्मयचकित स्वागत केले.

कुठेही, कधीही नाट्य–मंदिरासमोर वा चौपाटीच्या वाळवंटात ही निर्भेळ साहित्यिक घटना पार पाडली जाईल अशी घोषणा होऊन चोवीस तास लोटावयाच्या आत हा पहिला शब्दस्फोट घडवून आणला गेला. या स्फोटाच्या धक्क्याने चीनचा अतिवृद्ध कवी माओ हादरल्याचे अनधिकृत वृत्त हाँगकाँगमधल्या अनाहूत वृत्तसंस्थेने दिले आहे.

कवी श्री. नारायण रा. पेडणेकर अलिकडचे काही दिवस एक दीर्घभीषण, चित्तथरारक तर कधी वेदनादाही असा अति दाट रक्ताचा नि फुलांचा संमिश्र वास असलेला विविधरूपी अंधार भोगीत आहेत. त्या

अंधाराला विशेषतः आविष्कृती देणाऱ्या त्यांच्या काही कवितांद्वारे हा शब्दस्फोट घडून आल्याचा प्रत्यय सुजाण रसिकांना आला.

या शब्द्–घटनेचे प्रयोजन विदित करतांना श्री. नारायण पेडणेकर म्हणाले, आपला शब्द जगवण्याचे कलावंताचे त्राण आणि अवसान आज संपल्यासारखे वाटू लागलेय. माझा 'कस्तुरीमृग' प्रसिद्ध झाला तेव्हा मला आशीर्वाद देतांना आचार्य अत्रे यांनी माझ्या कवि–व्यक्तिमत्वात 'मायकोव्हस्की' पाहिला होता. पण आज आपण एक अगतिक 'बायकोव्हस्की' तर होऊन राहिलेलो नाही ना, अशा एक विषण्ण संशयापोटी ही शब्द-घटना साकार करण्याचा हिय्या मी केला आहे. आजकाल शब्द जगवणे कठीण झाले आहे हे नपुंसक जमान्याचे भान प्रतीत करणे ही या शब्द-स्फोटामागील प्रेरणा आहे. माझ्या जखमी 'कस्तुरीमृगा'ला खरे प्रकाशा-चेच वेड आहे. मला प्रकाश हवा आहे. सूर्य हवा आहे–अबाधित निष्कलंक !

☆ ☆ ☆

हे शब्दस्फोट पुढे पोस्टरांद्वारा, छोट्या–मोठ्या श्रोतृ-संमेलनांतून, हस्तपत्रिकांद्वारा सुरूच राहिले. या संग्रहातील काही कविता या अंधाराच्या प्रारंभीच्या दशकांत विविध नियतकालिकांतून प्रकाशित झाल्या आहेत, हे या कवितेचे कदाचित् द्रष्टेपण.

# ‘कस्तुरीमृग’ ते ‘शब्दस्फोट’

आणीबाणी सुरू होऊन तेव्हा फार दिवस झाले नव्हते. भीतीचे वातावरण दाटत चालले होते. लोक भयभीत झाले होते असे म्हणण्यापेक्षा ते भयचकित झाले होते असे म्हणणे अधिक योग्य होईल. ‘पायाखालची धरित्रीच निसटली’ अशीच लोकांची अवस्था झाली होती. अशा वेळी श्री. नारायण पेडणेकरांनी आपल्या ‘कस्तुरीमृग’ ह्या पहिल्या काव्य-संग्रहाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन जाहीरपणे घडवून आणले. प्रकाशन-समारंभ हे निमित्त होते. ते साधून त्यांना ‘शब्दस्फोट’ करायचा होता. आपण शब्दस्फोट करणार हे त्यांनी उघडपणे सांगितलेही होते. पण पोलिसांना शब्दस्फोट म्हणजे कुणाला बहुधा न कळणाऱ्या; आणि बहुतेक कुणी न वाचणाऱ्या कवितांकडे लोकांचे लक्ष वेधण्याची ती एक टूम असणार असे बहुधा वाटले असावे. शब्दस्फोट निर्वेधपणे पार पडला. त्या वेळी पेडणेकरांनी म्हटलेली ‘मी एक स्पार्टाकस...’ ही कविता ऐकण्याचा अनुभव अविस्मरणीय होता. स्पार्टाकस हे नाडलेल्यांनी स्वतःच्या माणुसकी-साठी केलेल्या बंडाचे प्रतीक आहे; नाडलेल्यांसाठी केलेल्या तजविजीचे प्रतीक नाही. जेव्हा विजयाची आशा मावळते तेव्हा अन्यायाविरुद्ध जे उठलेले असतात त्यांची सारी माणुसकी, सारी प्रतिष्ठा ते अन्यायाविरुद्ध प्राणपणाने उठलेले असतात ह्याच्यातच सामावलेली असते. जे साधायचे त्याचे मोल किती आणि ते साधायला किती मोल द्यावे ह्याचा विचार मागे पडलेला असतो. ताठ मानेने अनोळखी रस्त्याच्या कडेच्या खांबावर फाशी जाण्यात माणुसकीचा सारा अर्थ जमा झालेला असतो. ह्या एका क्षणात माणसाच्या भूत, वर्तमान आणि भावी इतिहासाचा जो सगळा अर्थ एकवटलेला असतो त्यानेच काय काय साधले, काय काय गमावले आणि अजून काय साधता येईल आणि किती साधायचे राहिले आहे

ह्या साऱ्या हिशेबाला अर्थ येतो. 'तुम्ही साऱ्या पृथ्वीचे राज्य कमावले, पण आत्मा गमावला तर त्याला अर्थ काय?' पेडणेकरांनी त्या दिवशी स्पार्टाकसचे प्रतीक जिवंतपणे श्रोत्यांपुढे सादर केले. मला त्या दिवशी असे वाटले की, पेडणेकर फार दिवस बाहेर राहणार नाहीत. कदाचित् शब्दस्फोट पोलिसांच्या कानी गेलेच नाहीत, कदाचित् ते कानी गेले तरी त्यांना ते ऐकू आलेच नाहीत, किंवा ऐकू आले तरी समजले नाहीत. हीही एक शक्यता आहे, की त्यांना ते समजले तरी किंवा ते समजले म्हणूनच त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. दिल्लीत किंवा मुंबईत मंत्रालयात बसून धोरणे आखणाऱ्या, कारस्थाने करणाऱ्यांपेक्षा नायगावला रस्त्यावरून गस्त घालणारा पोलीस अधिक शहाणा असेल, अधिक नेकीचा असेल.

ते काही असो. पेडणेकरांचे शब्दस्फोट चालूच राहिले. ध्वनिरूपाने किंवा छापलेल्या–भित्तीपत्रकांवर लिहिलेल्या कवितांच्या रूपाने. त्यांचा हा संग्रह आहे. वास्तविक पेडणेकर हे कवी आहेत–कस्तुरीमृगासारखे स्वतःच्या गंधित अंतरंगाने मस्तावलेले, स्वतःला शोधण्यासाठी सैरावैरा धावणारे :

प्रलोभन् नव्हतं तेव्हा सुवर्णाच्या मृगाचं
पोटांत नाही भूक पण चांदणं होतं भूलीचं
चांदणं होतं भूलीचं पिसंच ठाकतं मनांत

कस्तुरीचा मृग स्वतःभोवती घुमायचा
तेव्हा सारा पुरुषार्थ सार्थ असायचा!

स्वप्नात रंगणारा आणि स्वप्न व जागृती यामधील भेद विसरणारा हा कवी

आतांच इतुक्यांत मी स्वप्न पहात होतो
कैक दिसाच्या त्या माझ्या स्वप्नाच्या वैरिणी!
स्वप्न माझे ते मोडलेस का?

आणि तू तर आहेस स्वप्नासारखी
नि स्वप्न आहे चांदण्यासारख!

त्या तसल्या चांदण्यातही मी वेडा गाणी गातो
माझं स्वप्न सरलं म्हणून ही पहा पहाट फुलली !

पण ह्या कवीला माणसाच्या पूर्वसूत्राची जाण आहे आणि त्याच्याशी त्याचे इमान आहे. अंधाराकडून प्रकाशाकडे चाललेल्या अखंड प्रवासातील आपण एक वाटसरू आहोत हे तो विसरू शकत नाही आणि ह्या प्रवासातील साऱ्या सोबत्यांची कदर त्याला आहे.

हे पूर्वसूत्र खंडित झाले तर
जगात उरणार नाही अस्तित्व कसलेच अस्तित्वाला
मी अंधाराशीच सौदा केलाय उजेडाला जन्म द्यायला !

स्वतःचा 'वीर्यगंध युगांचा मिंधा आहे' हे तो ओळखतो. निर्मितीसाठी वेदनेचे, विनाशाचे मोल द्यावे लागते हे भान त्याला सतत आहे. ज्यांना हे मोल द्यावे लागते त्यांच्याविषयी त्याला हळुवार सहवेदना आहे.

आता रडू नकोस ग. ही प्रणयरात्र युगांपूर्वीच सुरू
झाली होती. रात्र कधी सरते ते कळत नाही
तुझाही गर्भ त्या उगवत्या सूर्यासारखा तांबूस असेल,
तेजस्वी असेल !

आशीर्वाद आहे हा माझा आशीर्वाद

किंवा

घणाघातांच्या श्वासांनी आता थोडेसे थांबावे
निळ्या भावलीच्या माथा हात हळवे फिरावे !

आणि ह्याबरोबरच 'अंधारा'ची जाणीव त्याच्या मनाला व्यापून राहणारी आहे. रिक्त, ज्यांची माणुसकीच हिरावून घेण्यात आली आहे अशा माणसांची दाटी. कृत्रिम, निर्जीव प्रकाशाचे पांघरुण ह्या अथांग अंधारावर घालून जणू काय तो तेथे नाहीच अशी बतावणी करणाऱ्या आजच्या सामाजिक वास्तवाचे त्याचे भान कधी क्षीण होत नाही.

कुणाची बाई कुणाशेजारी हे जिथे कळत नाही
तिथं मर्क्युरी दिव्याचा धुरकट प्रकाश पेंगत आहे !

ह्या अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा मार्ग अटळपणे चोखाळत राहिले पाहिजे आणि त्यासाठी पावलोपावली बलिदानाची किंमत मोजली पाहिजे हा ह्या सामाजिक वास्तवाचा अर्थही ते कधी विसरत नाहीत.

आणि तिथं कुणाची बाई कुणाशेजारी
हेच मुळी कळेनासे झाले आहे !

तो पहा—

त्या झेंडेवाल्याचाच मुडदा पडला आहे—
त्या दीर्घभीषण अंधारांत—
रक्ताच्या थारोळयातून—
उद्या सकाळी उठण्यासाठी !

ह्या मनोवृत्तीचा, साऱ्या वंचित माणसांशी वचनबद्ध असलेला हा कवी—

भिवबा रे घोषणा दे !
तुला तिचा अर्थ कळो न कळो,
तू ओरड आणि फाड माझे छाताड.
तो तितका अर्थ उरी भरून मी
त्या बत्तीच्या दिशेने धावत निघेन
तुझ्या अंगाचे सांवट शोधीत भले थोरले !

असे सर्व भिवबांना आश्वासन देणारा हा कवी आणीबाणीत गप्प राहील हे शक्यच नव्हते. कुणाही संवेदनशील, प्रामाणिकपणाची, मूलभूत मानवी मूल्यांची कदर असलेल्या व्यक्तीच्या आणीबाणीच्या काळात ज्या व्यथा असतील त्यांनी येथे शब्दरूप घेतले आहे. जीवनात जे काही निरागस, कोमल, माणसाने सारे बळ पणाला लावून ज्याचे रक्षण करण्यात धन्यता मानावी असे जे काही असेल त्याची हत्या झालेली आहे आणि हे साऱ्या

अंतर्यामाला व्यापून टाकणारे दुःख आहे. त्याच्याविषयी बोलून हलके करता येईल असे हे दुःख नव्हे.

गाण्यासह टिपलेला पक्षी
रक्ताच्या थारोळ्यात
पक्षी— रक्ताच्या थारोळ्यात
गाणे— रक्ताच्या थारोळ्यात

ह्या दुःखाबरोबरच ह्या परिस्थितीशी अखेरपर्यंत झुंजायचा निर्धार आहे.

पाय रोवलेलेच होते, पण
पायाखालची धरित्रीच निसटली
बिरादर, आमची जागा घ्या !
बिरादर, गणित पुरे
व्हा आता अगणित
बिरादर,
प्रतिकाराची शेवटची फळी कोसळतेय् !

हा निर्धार आहे, भाईबंदांना हाक आहे, तसाच ज्यांनी धृतराष्ट्राची भूमिका घेतली त्यांच्याविषयी तीव्र उपहासाची भावना आहे.

वर्दळीतले षंढ भवतालचे, बघतात, दचकतात, पसार होतात
ठाव सोडून ठराव करतात सभेत साले विचार करतात !
ह्यांनाही घरी असतात बाया, महाग मात्र झाल्यात घाया
चाललंय ते बरं आहे, दिसतंय तितकंच खरं आहे
खात्यांत जमा कशीबशी !

हे लोक कशाला इतके घाबरलेले आहेत ? ते स्वतःच्या कमकुवतपणाला घाबरलेले आहेत.

अंधारात
पाऊल वाजवू नकोस
अंधारात
आपलीच पावले
आपला पाठलाग करीत आहेत.

ह्या अनुभवातून एक प्रकारचे नैराश्य, हताशपणही येते.

काल एक महात्मा मेला लोकांसाठी लढणारा
लढता लढता तो महात्मा लोकांसाठी मेला
हे लोकांना ठाऊक नसावे हा लोकधर्म आहे !

किंवा

अधःपतनाच्या
अंधारवाटा
वाटेवाटेवरल्या
अंधारसावल्या
कोसळतच रहातात
... आता मैफिली नाहीतच
फक्त थडगी
नि वैराण इतिहास

पण हे नैराश्य क्षणिक आहे. कवीचा निर्धार कायम आहे. कारण त्याने अंधाराचा ठाव घेतला आहे.

सरणावरती गातो आहे रिते गीत पण कातरधार
अलख आळवी काळ भिकारी तममिंधा अन् निराधार

अंधार हे कवीचे आवडते प्रतीक आहे, अंधार आणि पक्षी.

अंधारात गांधारी...

किंवा

अंधारात पोलीस
सत्य ओलीस

किंवा

सत्याच्याच चालल्यायत चोरवाटण्या
अंधारात

तसेच

सूर्याला गिळलय बेसावध
एका महारोगी अजगर अंधाराने

किंवा

... आणि आता रथापुढे
अंधारसावल्या कोसळताहेत

'अंधारवाटा' ह्या कवितेत ही दोन्ही प्रतीके येतात.

... ते हिरवेबहर झाड
झाडावरला पक्षी
पक्ष्याच्या चोचीतले
आर्त गाणे ते हे नव्हेच

शब्दस्फोटाची योग्य ती दखल समीक्षक घेतीलच. पेडणेकरांचा एक (बराचसा निष्क्रीय आणि भांबावलेला) सहकारी म्हणून त्यांच्या शब्दस्फोटाबद्दलची माझी कृतज्ञता व्यक्त करायला केवळ मी हे लिहीत आहे. आमचा त्यावेळचा आक्रोश त्यांनी व्यक्त केला.

पापाच्या भाराने
नागफणा डगमगली
धरित्रीने ठाव सोडला
नि धरतीवरले सत्य उभे कोलमडले !

आमच्या तिरस्काराला समर्थपणे वाचा फोडली

... तर शहाजादीने बापालाच
आपल्या ठरविला बागी
नि चिणला त्याला
ह्या रंगमहालातील
एकविसातील एका खांबात !

आणि आमच्या कर्तव्याची जाणीवही करून दिली.

... आता प्रस्थानयात्रा सुरू होत आहे
आगवणव्याकडे
आयुष्याचे सारे हिशेब चुकते झालेयूत
आता अपार दुःखासह
ही आगवणव्याची वाट
चालायची आहे...

पेडणेकरांची कविता, त्यांच्या कवितेतील प्रतिमा, शब्द, ताल त्यांचे स्वतःचे आहेत. कुणाही प्रतिथयश कवीचा प्रतिध्वनी त्यांच्या कवितेतून ऐकू येत नाही. असा काही प्रतिध्वनी असेल तर तो लोकगीतांचा आणि ज्या अमानुष परिस्थितीशी झगडत त्यांनी आपले जीवन घडवले त्यातून उपजलेल्या रांगड्या लोकभाषेचा. ह्या कवितांचे साहित्यिक मोल समीक्षक ठरवतीलच. पण एका सच्चा आणि लढवय्या माणसाचे मानसिक प्रतिबिंब म्हणूनही त्यांचे एक विशिष्ट मोल आहे.

कीर्ती कॉलेज,
मुंबई.

**मे. पुं. रेगे**

# ऋणनिर्देश

या संग्रहासाठी अगत्याने प्रस्तावना लिहून देणारे माझे 'सर' प्रा. मे. पुं. रेगे यांचे मनःपूर्वक आभार.

हा संग्रह प्रसिद्ध झालाच पाहिजे असा हट्ट माझा बालमित्र विश्वनाथ लोध याने धरला व या हट्टाची पूर्ती माझे मित्र रचना प्रेसचे राघोबा म्हात्रे आणि टी. आर. राव यांनी केली हे येथे मी मुद्दाम नमूद करीत आहे.

माझ्या कवितेला वेळोवेळी ज्यांच्या सदिच्छा मिळाल्या ते सुहृद : सौ. शिरीष पै, माधव गडकरी, गोविंद तळवळकर, माधव मनोहर, दिनकर साक्रीकर, सदा कऱ्हाडे, प्रा. केशव मेश्राम, धों. वि. देशपांडे, राम पटवर्धन, प्रा. चंपा लिमये, एकनाथ पाटील, लक्ष्मण जाधव, अनंत मांडेकर, प्रभाकर मोरे, बाळ दंडवते, बाबुराव मुंबरकर, भाऊ पाध्ये, जयंत साळगावकर, विश्वास पाटील, हुसेन दलवाई आणि नारायण बांदेकर.

आणि ...

सत्यकथा, प्रतिष्ठान, युगवाणी, अस्मितादर्श, वैखरी, राजस, दै. मराठवाडा या माझ्या कवितेला प्रकाशांत आणणाऱ्या नियतकालिकांचाही मी ऋणी आहे.

**नारायण रा. पेडणेकर**

## पक्षी

गाण्यासह टिपलेला पक्षी
रक्ताच्या थारोळयांत

पक्षी—रक्ताच्या थारोळयांत
गाणे—रक्ताच्या थारोळयांत

## गांधारी !

अंधारांत गांधारी
आक्रोशतेय
बुभुक्षित अंधाराच्या
धृतराष्ट्र मिठींत
तेजाची सांवली
थरथरतेय !

# गांधारी !

अंधारांत गांधारी
अंतर्प्रकाशित
सूर्यतेजाची लक्ष
फळे भोगणारी.

अंधारासारखा
झपाटून राह्यलाय्
एक अगतिक धृतराष्ट्र
त्याच्या बुभुक्षित वज्रमुठींत
तेजाची सावली थरथरतेय् !

गांधारी,
पाप पुत्राच्या माते
आतां प्रस्थानयात्रा सुरू होत आहे
आगवणव्याकडे.
आयुष्याचे सारे हिशेब चुकते झालेयत्
आतां अपार दुःखांसह
ही आगवणव्याची वाट
चालायची आहे
आगीच्या ज्वाळा देखील
शीतल आहेत...
वेदनेहून.

तेजरती
थांब डोळा उघडू नकोस
चिरंतन वेदना जाळू नकोस !

# विश्वासघातकी हल्ल्यापुढे

अंधारातला बारुदसूर
दरवळतोय दूर
निषेध निसटलेत
मुसाफिर, वाटा फितूर

विश्वासघातकी हल्ल्यापुढे
हिय्या करून आम्ही
पाय रोवले होते
रक्तबंबाळ छातींतून
शेवटचा हुंकार
रक्तफुलासम गळून पडलाय्
पाय रोवलेलेच होते, पण
पायाखालची धरित्रीच निसटली
बिरादर, आमची जागा घ्या !

बिरादर, गणित पुरे
व्हा आतां एका अगणित
अंधाराला सामील
वरती लुकलुकणाऱ्या एकाकी
चांदणीवर भरंवसून.
हवेंत विसावलेले
आमचे नाडीचे ठोके
तुम्हाला इशारत देताहेत...

बिरादर,
प्रतिकाराची शेवटची फळी कोंसळतेय् !

# अंधारांत पोलीस !

अंधारांत पोलीस
सत्य ओलीस
पोलीस बापडा
अंधार उपडा
पोलीस पोसले
अंधार सोसले
पोलिसाला पावली पावली नाही
अंधाराला सावली गावली नाही !
सावल्या कोसळल्या
गस्ती ढांसळल्या
सावध !
गस्त ढासळत आहे !

# सैबेरिया !

शू! कोणी बोलायचे नाही
हाताची घडी. तोंडावर बोट.
पाखरांची शाळा भरे पिंपळावरती–
छे ! पाखरांची किलबिल नको
सारी पाखरे बंदुकीने टिपून काढा
पाखरेसुद्धा गातील स्वातंत्र्याची गाणी
भिडतील खुशाल भल्याखुल्या आभाळाला
पाखरे निसटतील. त्यांना पंख असतात.
ते पंख आधी जायबंदी करा
पाखरे गातील
त्यांच्या माना पिरगळा
गाण्याचाच गळा घोटा
हा गोंगाट थांबलाच पाहिजे
पाखरांच्या किलबिलाटात होतोय
घोषणांचा आभास
आता घोषणा नको
आता घोषणा बंद
काम हवे, घाम हवा.
आता तास अखंड कवायतीचा
न सरणाऱ्या रांगेतून
असेच पुढे चला
आता नवा धडा घोकाय्‌चाय्‌—

भ भ रे भाकरीतला
ल लसणीतला नव्हे

नव्हे लोकशाहीतला !
लोक संपले
आता शाही सुरू झाली !

तर ही गोष्ट शहाजाद्याची नव्हे.
बगदादच्या शहाजादीची
गोष्ट वख्ताची. तख्ताची
तख्तासाठी सांडल्या जाणाऱ्या रक्ताची नव्हे
गोष्ट केवळ तख्तावरल्या शहाजादीची
शहाजादी सलामत तर 'तख्ते' पचास
ही तख्ते, तख्तपोशी, तकिये, लोड
रंगमहालातले. लवंडेदेखील.
रंगमहालात हुजरेमुजरे
राणीचा दरबार रंगमहालात
न्यायनिवाडा रंगमहालात
दरबार बरखास्त
आता रंगमहालच सुरू
शहाजादीचा हुकूम आहे
महालात दरबाराची भाषा—
कोणी बोलायची नाही
दरबाराचा पोशाख करायचा नाही
तरवारीवर मूठ कोणी ठेवायची नाही
'मिशा' छाटून सारे पुरुष
महालात मुजऱ्याला हजर होतील.
मुजऱ्याला हुजरे हजर आहेत
साकी ! प्याला भर
सरदारीच्या पगड्या उतरवून

आलेल्या हरेक हरामजाद्याला नशा चढू दे!
इष्कमस्तीची मिजास आपल्या जनानखान्यातदेखील
जे बोलणार नाहीत
त्या लौंड्यांना गाऊ दे 'इष्का'ची गाणी!
शहाजादीला प्यारे आहेत
असले 'खच्ची' लौंडे
ते करणार नाहीत
दरबारी कारस्थाने.
शहाजादीला ठाऊक आहे
महालामधल्या एकवीस खांबांत
एकेक पुरुष गाडला आहे!
शहाजादीचा बाप
शहाजादीला म्हणाला,
बेटी सब्र कर
इतकी बदमिजाज बरी नव्हे
बरा नव्हे इतका बदफैलीपणा!
तर शहाजादीने बापालाच
आपल्या ठरविले बागी
नि चिणला त्याला
ह्या रंगमहालांतील
एकवीसातील एका खांबात!
हा रंगमहाल शहाजादीचा
हे कबरस्तान बगावतखोरांचे
ही कहाणी बगदादच्या
तख्तन्शीन् शहाजादीची!

त्या बगदादच्या शहाजादीला
बनवायचाय् ऐनेमहाल

गुलामांनो रांगा धरा.
रांगा धरा, कवायत करा
घोषणा नको, घाम गाळा
आता धडा घामाचा, कामाचा
धडा नवा, नवी शाळा
शाळा सुरू झाली
शू ! कोणी बोलायचे नाही
पिंपळावरच्या शाळेतील पाखरांनीदेखील किलबिलायचे
नाही !

शाळा सुरू झाली, रांग सुरू झाली
पाखरे बंद गाण्यासकट
आता सारेच गुलाम चालवले जाताहेत
एका सैबेरियाकडे !

# पापाच्या भाराने–

पापाच्या भाराने
नागफणा डगमगली
धरित्रीने ठाव सोडला
नि धरतीवरले सत्य उभे कोलमडले !

काल
एक सत्य आणि लाचार मी मरून पडलो
मी भुकेने तडफडून मेलो
नि सत्याचा दिवसाढवळ्या खून झाला

माझे मरण संभवनीय
चार चौघांसारखे
मला खांदा द्यायला
चार चौघेजण जमले नाहीत

हेही मी समजू शकतो
पण...
सत्याला खांदा द्यायलाही
चार चौघेजण जमले नाहीत

चार चौघेजण हल्ली जमेनासे झालेत
नि सत्य पडलंय एकाकी
छिन्नविच्छिन्न रक्ताच्या थारोळ्यात !

सत्याच्याच चालल्यायत चोरवाटण्या
अंधारांत
संगनमताच्या निःसंग नपुंसक अंधारांत
चोरवाटण्या चालल्यायत !

सत्याचाच मुडदा पडलाय्
तिथं गिधाडे जमलीयत
त्या गिधाडांतील कांहींनी
घातलाय काळा कोट
तर कांहींनी चढवलाय
न्यायाधीशाचा काळा झगा

आता चोर जमतील
चोरांचा पुढारी भाषण करील
नि सांगेल चोरांना
एक शाश्वत सत्य इथे मरून पडलंय !

तर्कांच्या बदचाल बंद बारा वाटा डावलून
बेभरवंशाच्या बेबंद वाटेवर
सत्य ठार मरू शकतं बेदखल
बेवारस
बदफैली बाईच्या पोरासारखं

तर्कांच्या बदचाल बारा वाटा आतां
कायमच्या बंद
बारबाप्या उनाड पोरा
या वाटे पुन्हां फिरकू नकोस
लूत लागून सडलेल्या कुत्र्यासारखं
मरून पडलेलं ते सत्यच आहे बापा !

काल सत्य होतं
आज नाही
काल सूर्य होता
उद्या सूर्य उगवणार नाही

सूर्याला गिळलय बेसावध
एका महारोगी अजगर–अंधाराने !

## अंधारांत—

अंधारांत
पाऊल वाजवूं नकोस
अंधारांत
आपलीच पावले
आपला पाठलाग करीत आहेत.

## कोंडी

अंधारांत मांजरी दूध पितेय
डोळे मिटून
तिची कोंडी करू नका
मांजरीला 'शुक शुक' म्हणू नका
तिला वाटतेय कीं
अंधारच आंधळा आहे !

# सैबेरिया !

गडद घोर अंधारलंय

पाखरांची किलबिल
बंद झालीय्.

हिंस्र श्वापदाचं
किर्र रान वाजतंय निःशब्द
भन्नाट भाबडे वारे बंद. कुंद.
सूर्य उगवला तरी
आतां उजाडायचे नाही.

या नीरवतेत
बंदुकीच्या गोळीने
टिपले गेलेले
एक मुक्त स्वैर
आकाशगामी
मनभोर राखी पाखरू
पडलंय निःष्प्राण
रक्ताच्या थारोळयांत !

गुलाम गाताहेत गाणे
उंटासमवेत
न सरणाऱ्या दाहक वाळवंटांत
गुलाम गाताहेत
सैबेरिया...सैबेरिया...बेरिया..सैबेरिया !

## यापुढे--

कपटाच्या काळोखांत
लाख लाक्षागृहें
पेटलीं उठति ज्वाळा
जळाले कोटि कुंतिपुत्र
हुंदका फुटायचा कुठला
यापुढें कुठलें कुरुक्षेत्र ?

## पलायन !

सांजेचा सुटतो कासोटा
क्षणांत उलटे होते छप्पर
असे एकटे श्वास निघाले
आज लावलें अंगा अत्तर !
विडा चघळला उभ्याउभ्याने
डांबर गिळते माझी पीक
फुका काढुनी छाती दिधला
अंधारांतील जारा धाक !
गळ्यांत घेऊन पाय पळालो
असा आगळा आणुन आव
पळताना पाहून सोडला
वर्दळल्या गल्लीने ठाव !

# हा राजकन्येचा रथ !

हा राजकन्येचा रथ
कुठं चालवला जातोय ?
हे अश्व सुंसाटलेयत्
कोणत्या दिशेला ?

हें पुष्पकोमल सुकुमार स्वप्न
एक कोंवळा प्रकाश ल्यालेलें
पांखरांच्या किलबिलीसह
कोण्या क्षितिजीं पहांटणाराय् ?

कुठं निघालीय ही राजकन्या
हाती वरमाला घेऊन ?
ही मुग्ध सलज्ज तेजकळा
कोण्या सूर्यनेत्रीं सामावणाराय् ?

रथ निघालाय् खरा पण
सूर्य मालवले जाताहेत
आणि आतां रथापुढे
अंधारसावल्या कोसळताहेत

रथ सुंसाटलाय्, हादरतायत
नियतीचे सात ताळ
क्षितिज नसलेला प्रवास पुढे
अंधारजबडा अक्राळविक्राळ !

रथ निघालाय् गांधारीचा
प्रकाशाकडून अंधाराकडे
अन् अंधारांत तिष्ठलेत
बुभूक्षित धृतराष्ट्र !

# बर्फथंड अंधार !

हा मरणस्पर्शीसा बर्फथंड अंधार
ही हिमवाट कधींहि न सरणारी
मृत्युकळेच्या भयाण सावल्यांतून हिमस्रावाच्या
मी निघालोंय पायतळचें बर्फ तुडवित
मी गातोंय् थरथरत्या ओंठांनी एका दूरच्या
सूर्यस्नात क्षितिजाचें लखलखते गाणे
मी गातोंय सूर्यसूक्त-एक बेहोष गाणे !
माझ्या काळजातलं हें सूर्यलक्ष्यी पांखरू
एका विश्वासघाताच्या क्षणीं टिपलं गेलंय
हा माझा ऊर भळभळता-वाहातंय आंतून
हें रक्त ऊन आणि हें बेहोष गाणे !

आतां मी मरून पडलोंय या बर्फथंड अंधारांत
मरणथंड बर्फांत गाडला गेलोंय ठार !
मी मरून पडलोंय खरा. पण उद्यां या
बर्फांतच होतील माझ्या वळलेल्या मुठींची आर्त झाडे
नि त्या झाडांत गातील पक्षी
हें माझे रक्ताच्या थारोळ्यांतील बेहोष गाणे !

# अंधार !

एक बाई एक बुवा दिसाढवळ्या अंधार करतात
अंधारांतलं ऊन खाजतंय अजून सूर्य नंतर गार होतात !
वर्दळीतले षंढ भवतालचे, बघतात, दचकतात पसार होतात
ठाव सोडून ठराव करतात सभेत साले विचार करतात !
ह्यांनाही घरी असतात बाया, महाग मात्र झाल्यात घाया
काळ अफाट, वाट सपाट, वेळ म्हणे चाललाय् वाया !
चाललंय ते बरं आहे, दिसतंय तितकंच खरं आहे
खात्यात जमा कशीबशी ! पुरव म्हणतात पुरं आहे !
शब्दांमधून वारं सरलं, दारांत भिकाऱ्याचं पोर आहे
गुपचुप घेतलं बसवून लूप, मिरास आमची थोर आहे !
घरात ‘ शहाणे ’ रस्त्यात वेडा, बेकाराचे ब्रह्म निराकार
एक बाई एक बुवा दिसाढवळ्या म्हणे करतात अंधार !

# अंधारवाटा !

अधःपतनाच्या
अंधारवाटा
वाटेवाटेवरल्या
अंधारसावल्या
कोसळतच राहातात
थडगीं उकरून
सुंसाट सुंसाटतात
राजप्रासादांतील
वखवखलेलीं भुतें
पेटताहेत पलिते
भुतांहातीं नि
काळजामधून
धून निसटलीय
आपल्याच मस्तींत
त्या तसल्या मैफलींतील
सुरांची बरसात
ती संततधार
तें हिरवेबहर झाड
झाडावरला पक्षी
पक्षाच्या चोंचीतलें
आर्त गाणे ते हें नव्हेच !
आतां मैफिली नाहींतच
फक्त थडगीं
नि वैराण इतिहास

घुबडांच्या घुत्कारांत
वाजतात पावलें
हें इतिहासाचें एक
जहरी पान
पानापानावर थडगी
फक्त पुरुषार्थांची
आणि एका भीषण अंधारांत
पागल राणी गातेय एक
रक्तस्नात बदफैली गाणे !

# आतां आतां तमकारा !

आतां आतां तमकारा, तमकारा !
प्रकारलेल्या तमांत सुंदर भयकारा !
गुण गुण गळलो, तमांत सरलों
सर्पविखाच्या विळखा सोड चमत्कारा !
हटांत हटलों, दिठीत फिटलों फक्त नागवा
देहनागव्या फक्त विकारा !
गिळण्या तुजला देह धारिला
हरलो. हारच प्राप्त अजगरा !
मालवली ही फणा अवेळी अन् रात्रकळा
सकळ सोहळा होय मोकळा नुरे तऱ्हा !
उरते केवळ केंस–मोकळे पांडुरकेंपण
आणि बडवते कोण उरा ?
आतां आतां तमकारा, तमकारा
हरलो रे मी तमांत सुंदर भयकारा !

# कॉम्रेड ठाणेश्वर !

कॉम्रेड ठाणेश्वर देवाज्ञा होणे नव्हती म्हणून निवर्तला.
कसेंही असलें तरी एवढें खरें कीं,
कॉम्रेड होत्याचा नव्हता झाला.
कॉम्रेड वस्तुतः संपुष्टांत आला.
संपण्यासाठी मरणाच्या यातना त्यानेही भोगल्या.
कॉम्रेड म्हणतात भोगवादी होता;
म्हणून त्याने मरणही भोगले.
आतांपर्यंत देत आला हजारों लोकांना
क्रांतीसाठीं मरणाचा संदेश !
पिसाटासारखा बोलत राहिला
हजारों लोकांत वावरत राहिला
लोक आणखी फक्त लोक
लोकांच्या गराड्यांतून चालत राहिला.
कांखेत फनेल, कंठात घोषणा, हातांत झेंडा
कॉम्रेड लोकांतून चालत राहिला
जमाव पाठीवर घेत पुढेच राहिला !
कुठल्याशा गिरणींत काम करीत असतां
लोकांसाठी भांडत राहिला
भांडता भडकवतां भडकून स्वतःच
लोकांदेखत गेटबाहेर झाला !
पोटापोटांतील आग पहात
संपांच्या आगींतून चालत राहिला
कॉम्रेड पहायचा तर त्याला डोळ्यांसमोर आगच दिसायची
आगीवर जगत, आग जागवत, आगीनेच कॉम्रेड–
निवला तर निवायचा !

हातांत नसतांना हातकड्या
   गळ्यांत केव्हा हार मिरवायचा !
आत होणे, बाहेर येणे
   चलान निघायचें भींतीकडून भींतीकडे;
कॉम्रेड कॉम्रेड जड तर खराच

   जडच निघायचें जडाकडे !
कॉम्रेड असायचा उठलेला
   कॉम्रेड असायचा पेटलेला
बिरादराशीं हुज्जतून—अडत
   कॉम्रेड असायचा सून्साटलेला !
एक दिवस असा उजाडला
   एका बापुड्याचा कॉम्रेड झाला
मग तो कॉम्रेड उठून उठला
   उठला सुटला कॉम्रेड सुन्साटला !
एक होता तो अनेकांत आला
   बापूडवाणा लोकांत आला
लोकांतला बाप्या लोकांचा झाला
   लोकांसाठीच लोकवासी झाला !
कॉम्रेड भोंवतीं लोकच असायचे
   कॉम्रेडसाठीं पोलिस टपायचे
कॉम्रेड लोकांचा होता. पोलीसांचा होता.
   'सीआय्डी 'वाल्यांचा होता.
होता तेव्हां नव्हता फक्त स्वतःचा !

काळ निघतो दिवस सरतात
   पक्षीसुद्धां झाडांतून उठतात !
झाडंसुद्धां स्वतःशीच स्वतःसाठी भिजतात
   कॉम्रेड स्वतःसाठीं लगीनही नाही न्हाला !

काळ निघाला. दिवस सरले
पक्षीसुद्धां थकून परतले !
झाडंसुद्धां स्वतःशींच स्वतःला गिळून अंधाराची झाली !
आणि उभा आख्खा कॉम्रेड थकला—
नि थांबला !
मिरवणूकींतून अंग मिरवणारा हाडपेरांचा कॉम्रेड
अर्धांगानं जागेवर पडला.
'एका अंगातून' लोक म्हणाले, 'वारं गेलं !'
खरच अरे वारं गेलं
नि जडासारखा कॉम्रेड जागेवर जखडला !
अंधारांतल्या झाडावर पक्षी फडफडतोय कां रे ?
कॉम्रेड असा तापानं फणफणलाय
कॉम्रेड असा बरळतोयस काय ?
"लोक निघताहेत. मिरवणुका निघाल्यात.
पोलीस येताहेत. 'सीआयडी'वाले येताहेत.
गोळीबाराचे आवाज येताहेत. दगाबाज येताहेत
बराकींचे बुलंद बार गाजताहेत
बडा मियाँ साला सरकारला फितूर झालाय्
आंतून साल्याने बाहेरची आग बंद केली.
लोकांनी त्याला ठेचलं पाहिजे.
लोकहो, ठेंचा त्याला. हाणा मारा !"
"लोक. लोक. लोकच कां येताहेत फक्त असे अंगावर
लोक आणि पोलीस परस्परांना फितूर होऊन
येताहेत माझ्या अंगावर
माझ्या एकट्याचा गळा दाबायला इतके लोक कशाला ?
मला एकटाच राहू द्या

मी एक पक्षी आहे एकाकी
अंधारांतल्या स्वतःशीच स्वतःसाठी--
भिजणाऱ्या झाडावरला
मला भिजत राहू द्या.
आगीने होरपळलेला पंख फडफडवीत
एकुडल्या चोंचीत एक थेंब घेऊं द्या !

# प्राजक्ताच्या आरक्त देठात

प्राजक्ताच्या आरक्त देठात रसरसलेले तांबूस त्राण
फुलांची अंगे कोसळली खाली
रातभर दरवळले ते होते प्राण !
कुणी प्राजक्तासारखं दरवळतं,
रातभर जळतं, गळतं आणि होतं निष्प्राण
आणखी कुणी उभेच पेटतात
एकाच क्षणात ज्वालामुखीची ओकतात शान !
दरवळणं खरं असतं, रात्र खरी असते,
असतात देखील अंगे खरी
सरू नये म्हणता चांदण्याच्या रात्री
स्वप्नेसुद्धा वाटतात खरी
अजूनदेखील पडतात स्वप्ने;
अजूनही काळीज सोडतं ठाव
प्राजक्ताची फुलं हळुवार पुसतात
कुठवर काळजा सोसशील घाव ?

# धर्म !

राजानं प्रजेला विचारू नये हा राजधर्म आहे
प्रजेनं उपासपोटी मरावं हा प्रजाधर्म आहे.
माणसं उपासपोटी मरतात
मरण्याआधी उपासपोटी झोपलेली असतात
अंग आखडून पडलेली असतात–
हे एक सत्य आहे !

काळापोटी जन्म घेतो दुष्काळ
रात्र सरते नि होते सकाळ;
सूर्य आल्यावरही हल्ली उजाडत नाही–
हे एक सत्य आहे !

प्रजा अमर असल्याचं गर्जत राजा मिरवत जातो
राजाला पंख असतात राजा उडत जातो
राजानं दुष्काळाची पाहणी करावी हा राजधर्म आहे
प्रजेनं उपासपोटी मरावं हा प्रजाधर्म आहे

जन्माला येताना स्वतः रडतात
मेल्यानंतर इतर रडतात
माणसं मर्त्य आहेत हे एक सत्य आहे
पण, उपासपोटी मरताना बोलत नाहीत
थुंकी गिळल्यागत शब्द गिळतात
हेही एक सत्य आहे !

इतिहासात म्हणे राजे लढत, माणसे मरत
हल्ली राजेदेखील लढत नाहीत.

माणसं मात्र उपासपोटी मरतात.
राजाने लढू नये हाही सध्या राजधर्म आहे
प्रजेनं उपासपोटी मरावं हा प्रजाधर्म आहे !

काल एक महात्मा मेला लोकांसाठी लढणारा
लढता लढता तो महात्मा लोकांसाठी मेला
हे लोकांना ठाऊक नसावे हा लोकधर्म आहे

काळजात कणवेचे कल्लोळ होते
श्वास जयाचे आगलोळ होते
त्या आगलोळांनी तख्त लपेटताना तो महात्मा उभाच जळला
महात्मा मेला याची दखल राजानेही घेतली नाही;
हा राजधर्म आहे !

महात्मा युगाचा असतो
पण राजा आणि प्रजा युगायुगांची असतात
राजा आणि प्रजा यांच्या संगनमताची शक्यता असणारा–
हा युगधर्म आहे.

मरणारा नि मारणारे दोघेही अमर आहेत !
आता काळोख होईल त्याला चांदणी फुटेल
निराधार आकाशातून तीही सुटेल !

# नागसाकिचे नाग मोकळे

नागसाकिचे नाग मोकळे, रान-श्वापदे जागी अजुनि
दूर नभांतिल भयभित तारा, भयभित ही धरणी !

युगांआधिची शिकार पडली, भूक अरे लागली मला
पाषाणांतिल शिल्प युगांचे विरघळते हिणवीत मला
नागसाकिच्या दग्ध मातितून भिववी भूतकहाणी
दूर नभांतिल भयभित तारा, भयभित ही धरणी !

पळाल कोठे ? जिकडे तिथली धुंवारत बघ जाय दिशा
बघा फाडुनि जळता डोळा, जळती डोळयांतील नशा
क्षणात गळले मुजोर मनगट लिहिते मृत्यु-कहाणी
दूर नभातिल भयभित तारा, भयभित ही धरणी !

हरणाऱ्या हरिशील कुठवरी आंतडेच रे सर्प जाहले
पिळवटला हा दंश शरीरी आज भुकेचे विष जाहले
विष-देह मी—स्पर्शित फिरतो स्पर्शशिला धरणी
दूर नभांतिल भयभित तारा, भयभित ही धरणी !

# अलख !

अंधाराचा जहरी प्याला दिवा दूरचा चमत्कार
तमांधळे हे पक्षी गिळती गळयांतूनिया मोतीहार !

कानी कुंडल मिरवित कान्हा सूर बासुरीतून पसार
तमात मूर्च्छित मीरा, उरले जहरतमी या जहरी जार!

आळवीत ये एक भिकारिण रिते गीत पण कातरधार
कातरवेळा कधीच सरल्या, मध्यरातीचा हा अंधार !

सोबत नाही सावटसुद्धा स्मृतीच जळत्या अपरंपार
शनैश्वराचे शाप भोगण्या काळहंस गिळि मोतीहार !

सरणावरली शरण सावली आहे झटकुन् आर न् पार
करोत पहारे माझ्याभवती भयजहराचे हे अंधार !

सरणावरती गातो आहे रिते गीत पण कातरधार
अलख आळवी काळ भिकारी तमांधा अन् निराधार !

# पेटलेली चाळ !

पेटलेली चाळ तीनशेतीन गाळयांची. जगण्याच्या चाळयांची
भुखाळ भोगांच्या ज्वाळांनी लपेटलेली खाजणाऱ्या वखवखीची
गांवपण न विसरलेल्या गावड्याची. लफड्यांची. झगड्यांची
वाकड्याफांकड्या थेरडीची. उफाड्याच्या लेकींची. सणासुदीला फुगड्यांची
निधड्या छाताडांच्या बेडर पोरांची. तडफडीची फडफडीची
बुलंद 'जंग' जांघेत जागवत निखारणाऱ्या बायांची
चाळ संवादांची. विसंवादांची. रक्तमाजोर हातघायांची
जंग जगून खंगलेल्या, कापूस पिंजून पिंजलेल्या लोहझुंजीच्या बाप्याबापड्यांची
नसनस पेटत ठेवून निःश्वसणाऱ्या बोनसच्या संपस्वप्नाची
बुलंद गळयांची. पावशेराच्या जोरावर डरकाळणाऱ्या शेरांची
वडेसागोतीच्या बेतांआगतात मारवाड्यांच्या बोकडांची
मनांत ताट विटांची. विटक्या रंगाची. खटक्या-खटल्यांची नि मटक्याची !
कोंगाऱ्याच्या हॉटेलाची. भुस्सारी वाण्यांची. गाण्यांची. पाळण्यांची
आबा न्हाव्याची. भाडेवाल्या भय्याची चाळ. खरी महमूद पीराची
चाळ ती सारी भोगते आहे, भोवडते आहे; भोगांच्या आगीत भडकते आहे.

"पुरेल तितका हवाय घोव
हवी तर आणखी बाई ठेव"

चाळ आहे आळ पचवून जगत राहणाऱ्या वीरांची ।
जगत राहणारे झिंदाबाद ! बाकी सारी दुनिया बाद !

# ब्रह्म म्या बांधिले लंगोटीत

हरलो हरीले । नाही अगा खंत
ब्रह्म म्या बांधिले । लंगोटीत !
ब्रह्मवेत्त्या बुवा । कान घे हवे ते
जाणीवेची मूठ । बंद माझी !
ब्रह्मसमंधा गा । भेटलाशी भेट
वेताळाशी गाठ । ध्यानी धर !
संतचरणाशी माथे लीन झाले
लाथाडिता आले । निःसंगत्व !
कारटा मायचा । करंटा वैभवे
भोगवटा माझा । वरवंटासा !
सुख–दुख भेदा । वरवंटा एक
उचलोन वाटा । स्थितप्रज्ञ !
ब्रह्म चमत्कारी । कारटी ही माझी
मीराशी गर्भवी रांडकूस !
रांडेचिया माये । पारखा गा झालो
रडलो, रडतो । नाही खळ !
बळ पायी आहे । चालेन थकेतो
रांडेचिया गर्भा । हात दे गा !
कसे कोणा ठावे । क्षितीज अंधारे
ब्रह्म परभारे । पळो जाता !
हरलो, हरीले । आज का गा खंत
ब्रह्म म्या बांधिले । लंगोटीत !

# तुटो आली गर्भनाळ

तुटो आली गर्भनाळ निका आळ घेतला
उरी दाटता भजन मुका टाळ घेतला
नाळ तोडिली स्वहाते हाता घात घेतला
घाते आघात करोनि घाव–प्राण घेतला !

प्राणे वागविले भार पाप भर्तार गा झाले
वांझ भर्तार भागले जारे गर्भ भागवले !
जार निखाऱ्याचे खाक राखरूण रागावले
रांडेपोटीच्या पिंडांनी माझे पिंडदान केले !

शिरी छिनाल सुखाच्या आज पाप खोवतोय
रक्त माखून उराचे तुझे भाळ भरतोय !
रांडे सौभाग्यवती तू, धन्य डोळां रडतोय
पाप पचले रातीला दिसा पुण्य ओकतोय !

# माग मरण मरण !

मरणा भिडणारे मैथुन अथवा माग मरण मरण
रक्तांनी न्हालेल्या शब्दांनी जुळव हा कळसाचा चरण !

शिपायाला आदेश रहा हत्यारबंद जमिनीस जखडलेला
असायलाच हवाय् काळजापर्यंत मस्तमत्त शत्रु भिडलेला !

न फिटलेली ऋणे आठवून आता पुरते भिडायलाच हवे
युगायुगांच्या षंढत्वाने आतां झिंगून लढायलाच हवे !

जपले होते सनातनत्व झिजून झिजून मरत मरत
मरून उठल्यावाचून कधी नाहींच जगण्याचे मोल ठरत !

लागट आम्ही जगत राहाणारे वांझ आमुची भूक न् भक्ती
एकवटलो असे कधीच नाही नपुंसकालिंगी अमुची विभक्ती !

# मी एक स्पार्टाकस

अंधारांतून आवाज येताहेत
मी एक स्पार्टाकस !
स्पार्टाकस !
स्पार्टाकस !
हे शहर उध्वस्त
ह्या कबरी मैलोमैल
ह्या प्रत्येक कबरीतून
आवाज येताहेत
मी एक स्पार्टाकस !
स्पार्टाकस निघालाय स्वतःच्याच
पावलांनी चालत
आपल्या कबरीकडे
स्पार्टाकस निघाला आहे
स्वतःचाच क्रूस घेऊन
स्वातंत्र्याच्या अभिलाषेसह
स्पार्टाकस निघाला आहे
आपलाच एक क्रूस घेऊन.
जिथे जिथे त्या शब्दागणिक
उगवला आहे एकेक क्रूस
एकेक कोंब लव्हाळ लडिवाळ क्रूसाचा.
ह्या प्रत्येक कोंबागणिक
उमटताहेत शब्द
मी एक स्पार्टाकस !
हे लव्हाळ लडिवाळ गाणे

क्रूस वाहणाऱ्या स्पार्टाकसचे
न सरणाऱ्या अंधारातून
प्रकाशाच्या आंचेपोटी
निघालेयत स्पार्टाकस.
एकेक स्पार्टाकस
हजारो स्पार्टाकस
हजारो गुलाम आवाजताहेत
आवाज देताहेत
गडद भीषण अंधाराला
थरकाप भरवीत
आवाज देताहेत
मी एक स्पार्टाकस !
मी एक स्पार्टाकस !
स्पार्टाकस ! स्पार्टाकस ! स्पार्टाकस !

स्पार्टाकस,
स्पार्टाकस,
अरे, हे लडिवाळ गोंडस बाळ
तुझ्या पहाडी बाहूंकडे झेपावू पहातेय रे.
ही तुझी प्रीत-खूण रक्तांगी
ही तू माझ्या ओटीत टाकलेली
आर्त किंकाळी
आणि जखमी गाणे !
हे गाणे सुरू झालेय
स्पार्टाकस,
हे गाणे सुरू झालेय
पण,

तुझ्या पहाड छातीमधली वादळे अशी
बंद का ?

स्पार्टाकस !
स्पार्टाकस,
स्पार्टाकस, अरे ! तू मरून पडला आहेत !
स्पार्टाकस, तू एका स्वातंत्र्याच्या बेहोष
गाण्यासह मरून पडला आहेस.

# आदेश

सहस्राना आदेशिण्याच्या सवयीच्या गर्वातंच—
    मी त्या गडद अंधारांत माझा आवाज फेकला आहे.
अंधारातल्या बुभुक्षिताला म्हणे आदेश हवा आहे.
मला कफल्लकाला आज वाचा फुटली आहे ती—
                    भुकेच्या जयजयकारासाठी !
आतड्याच्याच पिळाने सत्तेच्या मुळांशी तरफ लागेल,
                    उभी सत्ता पालथी पडेल;
ह्याच एका उद्दंड विश्वासाने मी माझा आवाज—
                    त्या गडद अंधारात फेकला आहे.
भुकेच्या अवलादीनं आता तरी उठावं
                    सुसाट सुटावं.
छे ! अंधारात तर काहीच घडत नाही
अंधाराच्या आश्रयाला सत्ताच तर आली नसेल ?
अंधाराचे संगनमत सत्ताधिशांशी
आणि कट शिजलाच तर तो—
                माझाच पाय जागच्या जागी उखडण्याचा
त्या अंधारात फेकलेला आवाज झालाय गायब.
आवाजाच्या रोखाने कुणीच पुढे सरकले नाही
भुकेचा जयजयकार भुकेसारखाच तडफडला.
वेश्येची माडी चढतांना गिऱ्हाईकसुद्धा शरमिंदे परतले.
            "देह आडवे घालून देहाने तरी अडून रहा.
            अडवा तो रणगाडा.
            शत्रु सीमेआंत कधीच खूप घुसलेला आहे.
            व्हा आडवे !"
छे ! आवाजाच्या रोखाने कुणीच पुढे सरकले नाही.
छिनाल सत्ता अंधाराशी संगनमत करून निपचित—
                    पडली आहे !

# आसुसलेला ओठ खुळा

राधा हळवी मनबाधेची गोकुळामधे दहिहंडी
पुरभय्यांच्या थव्यांत नाचे व्यथामोकळी कुणी रंडी

हळवा हळवा चाळ हरवला उरला रोख इथे सैंया
सूरपटाची फिटे बासरी गल्लीतच चळला भैया
कटिघट खचले रूची रूचीचे गुलाल माखुन नोट उडे
वेश्येपुढती भाषण करिती देशभक्त पण पोट पुढे

जगण्याचे त्रांगडे गळ्यांत जगण्यासाठी घोट गळा
नोटेसाठी प्राण पांखडा आसुसलेला ओठ खुळा

# ॐकाराची प्रार्थना !

ॐकारा आदिरुपा
अक्षरा श्रीगणेशा
नि:शब्दा शब्दा
शब्दब्रह्मा !
आम्ही आमुचे
श्वास–प्राण एकवटुन
तुला आळवीत आहोत
आम्ही आवाहन
करीत आहोत
तुझ्या मंत्रशक्तीला.
तूं ब्रह्म, तू शब्द
शब्दांतूनि सृष्टी झाली
शब्दांचीच सृष्टी झाली
शब्द हरवता
सृष्टी सरली
आणिक डोळा
भोवळ आली
आम्ही हरवलो आत्मरूप
हरवलो स्वत्वचि !
शब्दा नुरे अर्थभान
शब्दी नुरे संवाद
अंतराची कवाडे
जाहलीत बंद !
आता कोणी

बोलू नये
एकमेका
संवादू नवे
वृक्षलतांनी
शहारू नये
पक्ष्यांनी
फडफडू नये
चोच वासुनि
गाऊ नये.
वासराने
हंबरू नये.
पान्हा दाटला तरीही
गायमाय करुणेची
नि-सूर नि-तूर !
शब्द सरला
सरला प्रकाश
सुरू जाहला
घनांधकार !
हा दिवसाढवळ्या अंधार
हा धृतराष्ट्राचा दरबार
येथे दु:शासनी अत्याचार
असह अबला द्रौपदीवरी.
चालले दु:शासनाचे क्रौर्य
तरी आम्ही नि:शब्द आचार्य
संपले आमुचे नीतिधैर्य
आम्ही मिंधे पापान्नाचे !

द्रौपदीच्या लज्जे हात
घालितो समक्षी दुःशासन
तरी सारा पुरुषार्थ विसरून
आम्ही पांडव नतमस्तक !
        आम्ही जगण्यास सवकलो
        आम्ही मरणाते भ्यालो
        आम्ही पुरुषार्थाते विसरलो
        धर्मक्षेत्रे ! कुरुक्षेत्रे !
म्हणून हे ॐ कारा
साकारा, निराकारा
प्रकटावे तू विराटरूपा
कडाडोनी वीजलोळसे !
        आता होऊ दे आत्मस्फोट
        आता होऊ दे शब्दस्फोट
        सरू दे हा तिमिर दाट
        दिशा दिशा उजळू दे !

# आता नुकतेच

वेश्या आणि महात्म्याला वाट देणाऱ्या
तटस्थ डांबरी रस्त्यावरून
परचक्राचे बेगुमान काफिले बारुदगच्च रणगाड्यांसह
आताच शिरलेयत् शहरांत.
आताच नगरपालिकेची कचऱ्याची गाडी
दिवसाचा ढिगारा उचलून गेली
मवाल्याहातून नाहक मेलेल्या पांढरपेशाचे प्रेत उचलून
शववाहिनीही नुकतीच गेली.
पोलिसाने वेश्येकडून, जुगाऱ्याकडून, फेरीवाल्याकडून
आपली पावली आताच तर वसूल केली
नुकताच एक संप मिटला मालक-पुढाऱ्याच्या संगनमताने
नुकतीच मंत्र्याने कंत्राटशेटजीशी मतलबाची भेट संपविली
नुकताच एक चिक्कार मारामारीचा सिनेमा संपला
नुकताच शेअरबाजार बंद झाला
लोकसभेतील शुष्क चर्चा आताच आटोपली
नुकतीच सांज सरली. बत्तीवाल्याने रस्त्यावरली
बत्ती पेटवली.
रस्त्यावरले श्वान शहरी इमानाने
बेखबर भुंकत सुटले.
आणि नुकतेच कळले की—
शहरात परचक्र शिरले !
नुकताच आता शहरचौकात आंधळा भिकारी
गात होता 'दानत-बरकती'चे आशीष गाणे !
दानत-बरकतीचे मोल जेव्हा भिकारीही गाऊ लागतात
तेव्हा मूल्यांना मूल्य उरत नाही नि
तेव्हाच परचक्र घुसू लागतं बेगुमान शहरात !

# नेमके म्हणे पडतात —

नेमके म्हणे पडतात ते आंधळ्याचे हात
दिवसाढवळ्या डोळस नागवले हातोहात !
ठाऊक आहे मला एका पुढाऱ्याची बात
केला म्हणे त्याने आपल्या लेकीचाच घात !
निघालीच आहे तर घाताचीच बात
मीच माझा करीत असतो रोजनित घात !
दानतीच्या सांगू ! नाही आंखडता हात
मैतराच्या गरजे शेजे काढलीय रात !
सरतच नाही, सलतच राहते तिलाच म्हणतात रात
उरत नाही ऋणांगांनी तीच दुणी बात
उरकणे असेल उरकून घ्यावी हीच हातची हात
आंधळे किंवा व्हा पडतील नेमके म्हणजे हात

# शाहीर मी भुकेचा !

शाहीर मी भुकेचा जाहीर बंड करतो
पिंडा दिले इमान ब्रह्मांड ध्वस्त करतो
जो तार ने शिगेला असतोय वख्त जळता
उलथून पडति स्वप्नि त्या क्रूर तख्तसत्ता !

षंढत्व पांडवाचे मी फेडतो सभेत
नग्नांग आदिपुरुषा मी पाहतो नशेत
नस गावते क्षणाला उरतो न काळ शेष
लावून उभा जळतो मी द्रौपदी पणास !

# आज मला स्वप्न पडे !

पठाण ठाण मांडला कोरतो कलिंगडे
गल्लीच्या पडजिभेत अडखळते कुलंगडे
जाराच्या बरगडीत इष्काचे वीष चढे
वीषकंठ रूद्रभूक आज तिचे लिंग पडे !
बत्तीच्या भवताली दिप्तिभुके मरति किडे
गस्तीचा पोलिस तो त्याची तर तार चढे !
पावलिला पाहुनिया पावन ती गस्त अडे
गस्तीवर भिस्तावुन सत्तामद मस्त चडे
जाराच्या वीर्यामधी बेजारुनि जोर चढे
अन् तजल्या बाईच्या शब्दाला तेज चढे !
'घाई' चे बाईपण ते तसले ! काय अडे ?
पेटलाय क्षण हा तर मीच जार, मीच पुढे !

जार जरी जळलो मी जारपणा पीळ चढे
जळु शकता जाळिन मी आज मला स्वप्न पडे !

REFBK-0021851
REFBK-0021851
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३३९८ ३१:२४
२१८४१
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)